सत्य प्रभा दि. ०२/०८/२०२२

# भाग्यनगर पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोधपथकाने एका तासात केला जबरी चोरीचा गुन्हा उघड

**नांदेड दि.१–** भाग्यनगर पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. रविवारी ३१ जुलैच्या सायंकाळी झालेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील चार जणांना ताब्यात घेतले असून आरोपींकडून ३७ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काल रविवार दि.३१ जुलै रोजी सायंकाळी ६.१५ वा सुमारास रविराज रामराव वाडेकर,वय–१८ वर्ष,रा.पोर्णिमानगर, नांदेड व त्याचे दोन मित्र असे सम्राट बारचे बाजुस ...ळा रोड येथे रोडचे बाजुस थांबले असता तेथे दोन मोटार सायकलवर चार अनोळखी इसम आले त्यातील एकाने त्यांना खंजर दाखवुन इतर तिन जणांनी त्या त्यांचे खिशातील दोन मोबाईल किंमत ३७,०००/– रुपये व नगदी ४५०/– रुपये काढुण घेतले. या बाबत पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथे गुरन २६३/२०२२ कलम ३९२,५०४,५०६,३४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा गुन्हे शोध पथक प्रमुख सुशांत किनगे,सहाय्यक पोलीस निरीक्षक व त्यांचे सोबतचे पोलीस अंमलदारे पोहेकॉ किशोर हुंडे, पोना गर्दनमारे यांनी मिळुन गुप्त बातमीदाराचे मदतीने एक तासात गुन्हा उघडकीस आनुन गुन्ह्यातील चार आरोपी नामे जळबाजी उध्दव आठवले, वय–२८ वर्षे, रा.लिंबगाव ता.जि.नांदेड, गोपाळ प्रकाश दुधमल,वय–३२ वर्षे, रा.लिंबगाव ता.जि.नांदेड, अक्षय रमेश पोहरे, वय–२७ वर्षे, रा.पंढरपुर नगर वाडी बु. नांदेड, संतोष शिवाजी वाघमारे वय–२२ वर्षे, रा.वडवणा ता.जि.नांदेड यांना ताब्यात घेतले तसेच त्याचेकडुन गुन्ह्यातील जबरीने चोरुन नेलेले रेडमी कंपनीचे दोन मोबाईल व नगदी रक्कम ४५०/– रुपये असे एकुण ३७,४५०/– रुपयाचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापर केलेली दोन मोटार सायकल व खंजर जप्त केले आहे व गंभीर स्वरुपाचा गुन्हा उघडकीस आनुन चांगली कामगीरी केली आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधिक्षक निलेश मोरे, अपर पोलीस अधिक्षक विजय कबाडे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख व पोलीस निरीक्षक पो.स्टे भाग्यनगर नांदेड सुधाकर आढे यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शोध पथकातील प्रमुख सपोनि सुशांत किनगे, पोउपनि सुनिल भिसे, पोहेकॉ किशोर हुंडे, पोना गर्दनमारे, पोकॉ कवडे यांनी पार पाडले आहे.

गोदातीर समाचार ०२/०८/२०२२

# हदगाव येथील घरफोडीतील सोन्या-चांदीचे व नगदी ११ लाख ७४ हजाराचा ऐवज जप्त

**नांदेड–** हदगांव शहरातील बसवेश्वर चौक येथील प्रमोद शेट्टी यांचे घरी अनोळखी चोरट्यांनी धाडसी जबरी चोरी केली होती. या प्रकरणातील तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांने दोन दिवसांपूर्वी अटक केली होती. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांच्याकडून ११ लाख ७० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हा वरीष्ठांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात स्था. गु.शाच्या पथकाने आठ दिवसात आरोपी निष्पन्न करुन आरोपी लक्ष्मण पिराजी मेटकर (वय ३३) (व्यवसाय मजुरी रा. नांदुसा ता. अर्धापुर जि. नांदेड ह. मु. संगतसाब गुरुव्दाराजवळ, चौफाळा, नांदेड), दशरथ गंगाराम देवकर (वय ५०) (व्यवसाय मजुरी रा. दगडवाडी ता. हदगांव जि. नांदेड), राजु लचिराम देवकर (वय ३९) (व्यवसाय मजुरी रा. बटाळा ता. भोकर जि. नांदेड) यांना अटक करण्यात आले होते. अटक आरोपी हे दिनांक दोन आगस्टपर्यंत पोलीस कोठडीमध्ये आहेत. पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे व पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील पोउपनि सचिन सोनवणे, हवालदार गुंडेराव करले, गंगाधर कदम, सखाराम नवघरे, विठ्ठल शेळके, संजिव जिंकलवाड, मोतीराम पवार, रवि बाबर, देवा चव्हाण, गजानन बयनवाड, शेख कलीम यांनी पोलिस कोठडी दरम्यान मुद्देमाल हस्तगत केला आहे. नमुद आरोपीतांकडुन आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

